# सिंबिलाईन् - गो. वा. बापट

गो. वा. बापट यांनी सिंबिलाईन् या शेक्सपीअरच्या नाटकावरही रंगभूमी नियतकालिकात लिहिले आहे.

श्री. बापट म्हणतात, Romeo and Juliet , आणि Two Gentlemen of Verona या दोन नाटकात love at first sight या प्रकारच्या प्रेमाचे चित्रण आहे. प्रेमाचा दुसरा प्रकार म्हणजे सहवासोत्तर प्रेम
Cymbeline मधील तारा४ व हंबीरराव (मुळातील Imogen and Posthumus Leonatus ) यांच्याबाबत परिचयानंतर प्रेम आणि नंतर विवाह असे घडलेले आहे. तारेच्या पातिव्रत्याबाबत हंबीररावाला आलेली शंका हा Cymbeline चा विषय आहे. हा विषय नाटकाला फार योग्य आहे असे श्री. बापट म्हणतात. कारण प्रेमविपर्यासाचा आभास नायकाला होतो. प्रेक्षकांना तो आभास आहे हे माहीत असते. त्यामुळे निवडीच्या दृष्टीने त्यांच्या मनात धक्का पोहोचत नाही. त्या आभासाला बळी पडणारा नायक, त्या नायकाच्या आभासाला बळी पडणारी नायिका, आभासाला कारणीभूत होणारी व्यक्ती किंवा स्थिती या सर्वांपासून जेवढा उपदेश व जेवढे मनोरंजन शक्य आहे तेवढा उपदेश व तेवढे मनोरंजन प्रेक्षकांस करून घेता येते.

ज्या नाटकांचा विषय हा आभास आहे त्या शेक्सपीअरच्या नाटकांपैकी Romeo and Juliet, Cymbeline व Two Gentlemen of Verona या तीन नाटकांवर श्री. बापट यांनी परीक्षणलेख लिहिलेले आहेत. Othello चा विषयही संशय हाच आहे. परंतु त्यावर श्री. बापट यांनी लिहिलेले नाही. शेक्सपीअरच्या नाटकातील प्रेमभावनेचे विविध पैलू हा विषय त्यांच्या डोळ्यापुढे होता. ूलशश्रळशि वर लिहिताना प्रथम मराठी रूपांतरातील पात्रांची नावे त्यांनी घेतली कारण मूळ नाटकापेक्षा मराठी रुपांतर तत्कालीन वाचकांना परिचित होते हे असले पाहिजे. श्री. बापट हे नाटकाचा हेतू मनोरंजन आणि उपदेश हा मानणारे होते ही गोष्ट त्यांच्या वेगवेगळ्या लेखनातून स्पष्ट होते. नाटकाद्वारे लोकाभिरुचीची जडणघडण झाली पाहिजे. करमणुकीतून सदाचाराची शिकवण मिळाली पाहिजे ही दृष्टी रंगभूमी नियतकालिकाच्या काळात आणि त्यानंतरही बरीच वर्षे प्रभावी राहिलेली दिसते. Romeo and Juliet हे नाटक म्हणजे Tragedy आहे. Cymbeline आणि

Two Gentlemen of Verona ही दोन्ही नाटके Comedies आहेत. Romeo and Juliet वरील विवेचनात श्री. बापट यांनी Tragedy च्या संदर्भात समतोल विवेचन केलेले आहे. ते त्यांच्या स्वतंत्र नाट्यदृष्टीचे द्योतक आहे. Comedy म्हणून वेगळा विचार मात्र इतर दोन नाटकांच्या संदर्भात त्यांनी मांडलेला नाही. व्यक्तिचित्रण आणि मानवी स्वभावाचे दर्शन यावर त्यांनी भर दिला आहे.

Cymbeline चे कथानक थोडक्यात सांगून श्री. महाजनी यांनी आपल्या रूपांतराला ‘ तारा ’ हे नाव दिले आहे. त्याबाबत काही विचार व्यक्त केले आहेत. मुळात Cymbeline हा ब्रिटनचा राजा आहे. Imogen ही
Cymbeline च्या प्रथम पत्नीची मुलगी आहे. श्री. बापट म्हणतात Cymbeline ऐवजी तारा हे नाव श्री. महाजनी यांनी कोणत्या विचाराने दिले ते सांगता येत नाही पण नाटकाचा मुख्य भाग Cymbeline ची कथा नसून
Imogen d Leonatus यांच्या प्रेमाची कहाणी हा आहे असेच त्यांनी माझ्याप्रमाणे मानले असावे. या प्रेमकथेचा प्रत्यक्ष दाखविलेला भाग लहान आहे हे खरे पण हा भाग इतर भागाचा जीव आहे. या कथेनेच इतर सर्व भागास चलन मिळत आहे. राजा व राणी यांच्या नाटकातील कृतीस तोच भाग चालक आहे. शेवटच्या भागाचाही तो चालक आहे.
Imogen व Leonatus यांचे एकमेकांवर प्रेम कसे बसले हे या नाटकात दाखविलेले नाही. त्यांच्या ताटातुटीपासूनच नाटकाला सुरुवात होते. प्रेमविपर्यासाचा भास होण्याचा जो भाग आहे तोही फार त्रोटक आहे. सारांश, तेवढ्याच भागाकडे पाहिल्यास त्यात मनोरंजन व उपदेश या दोहोंचाही अंश फारसा नाही असेच म्हणावे लागेल.

याबाबत, पुढे श्री. बापट यांनी अतिशय मौलिक विचार व्यक्त केला आहे. नाटकाच्या मुख्य भागाचा त्रोटकपणा किंवा विस्तृतपणा ही त्या भागाच्या मुख्यत्वाची कसोटी नाही. तर त्याच्यात जी चालक शक्ती असते तीच त्याच्या मुख्यत्वाची कसोटी असते. हा विचार फार महत्त्वाचा आहे. याच कसोटीवर ते Imogen and Leonatus यांची प्रेमकथा हा या नाटकाचा मुख्य माग मानून त्याचे परीक्षण करीत आहेत. ते म्हणतात की या दृष्टीने परीक्षण करताना अर्थातच आभासाचा जो भाग आहे तेवढ्याचाच विचार करणे अशक्य आहे. चालक व चलित या दोहोंचाही विचार करणे आवश्यक आहे.

प्रेमव्यभिचारशंका हे या नाटकातील सूत्र डोळ्यापुढे ठेवून श्री. बापट यांनी नाटकातील या संदर्भातील घटना आणि
Leonatus ची व्यक्तिरेखा यांची चर्चा केली आहे. श्री. बापट यांच्या मते Leonatus ला Imogen बद्दल आलेल्या शंकेची वाढ हळूहळू व्हावी तशी झालेली नाही. पण शेक्सपीअरने ही उणीव आपल्या चातुर्याने भरून काढली आहे आणि असे केल्यानेच या नाटकाला मनोरंजकत्व आले आहे. मुळात Leonatus ने लावलेली पैज व्यावहारिकदृष्ट्या चमत्कारिक आहे. पण ती पैज लावताना त्याची चित्तवृत्ती भडकलेली होती. त्याला संभाषणात डिवचलेले होते असे दाखविले आहे. Ichimo ने Leonatus ला, आपण पैज जिंकली ही गोष्ट टप्प्याटप्प्याने सांगितली आहे. प्रथम तो महालाच्या खाणाखुणा सांगतो, मग तिच्या हातातील कंकण दाखवतो मग तिच्या शरीरावरील तीळाबद्दल बोलतो. ते ऐकताना Leonatus च्या मनात पहिल्या पुराव्याने शंका उत्पन्न होते, दुसऱ्या पुराव्याने वाढ होते व तिसऱ्या पुराव्याने Imogen ने आपला विश्वासघात केला याबद्दल खात्री होते.

श्री. बापट आपल्या विवेचनात सांगतात की, या नाटकात Leonatus लाच आभास झालेला आहे असे नाही तर नाटकातील प्रत्येक पात्राला आभास झाला आहे. राणीच्या लाघवीपणाने ती खरोखरच प्रेमाची मूर्ती आहे असा आभास राजास झालेला आहे. आपण गरिबाची मुले आहोत असा आभास राजाच्या मुलांना झालेला आहे. Imogen ला, चाकराने आपल्याला विष दिले असा आभास झालेला आहे. आपल्या कावेबाजपणाने सर्वच फसले पाहिजेत व फसत आहेत असा आभास राणीला झाला आहे. Leonatus ला कोणी तरी इटालियन सटवीने आपल्या पाशात गोवले आहे व त्यामुळे त्याचे प्रेम नष्ट झाले आहे असा आभास Imogen ला झाला आहे. जेव्हा शेवटच्या प्रवेशात ही सर्व पात्रे एके ठिकाणी जमतात तेव्हा हळूहळू त्या सर्व आभासांचे निरसन होत जाते. आपण असे कसे चकलो याबद्दल प्रत्येकाला आश्चर्य वाटते. आपल्या मूर्खपणाच्या वर्तनाचा परिणाम वाईट झाला नाही, याबद्दल आनंद वाटतो सुष्टांना पारितोषिक व दुष्टांना योग्य ती शिक्षा मिळालेली पाहून प्रेक्षकांना फारच आनंद वाटतो.

श्री. बापट यांनी या नाटकाविषयीची दोन परस्परभिन्न मते नमूद केली आहेत.

> Johnson has charged its fiction with folly, its conduct with absurdity, its events with impossibility

दुसरे मत –

The play if not in construction of its table one of the most perfect of the authors productions, is in point of poetic beauty of Vanity and truth of character and in the display of sentiment and emotion, one of the most lovely interesting.

या दोन्हीपैकी कोणते मत रास्त आहे हे ठरविण्यास श्री. बापट यांच्या टीकेने मदत होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. पण श्री. बापट यांची या लेखामागील भूमिका, त्यांनी स्वत:ला घालून घेतलेली मर्यादा येथे लक्षात घेतली पाहिजे.

या लेखात त्यांनी संविधानक सांगितले. नाटकाचा मुख्य विषय सांगितला. तोच मुख्य का मानायचा ते सांगितले आणि Leonatus ची व्यक्तिरेखा अचूक समजली तरच या नाटकाचे रहस्य कळेल असा विचार मांडला.
Poetic beauty, display of sentments – इत्यादीचा विचार यात कोठेही नाही. थोडक्यात
Cymbeline चे सर्वांगीण परीक्षण नसल्यामुळे या नाटकाविषयी मत बनविण्यास या लेखामुळे मदत होईल एवढेच त्यांनी म्हटले आहे ही गोष्ट नमूद करावीशी वाटते. अभ्यासकाची दृष्टी कशी नेमकी आणि स्वच्छ असावी लागते. आपण काय करीत आहोत याचे अचूक भान त्याला कसे असावे लागते ते श्री. बापट यांच्या लेखनातून कळते. समीक्षालेखातून दिसणारे व्यक्तिमन, समीक्षकाची विचारसृष्टी हीसुद्धा पुढील अभ्यासकांना मार्गदर्शक असते. यादृष्टीनेही श्री. बापट यांचे लेख महत्त्वाचे आहेत.

श्री. बापट आपल्या लेखात म्हणतात की हे नाटक पाश्चात्यांचे आहे पण यातील पुष्कळ भाग आमच्याकडील वस्तुस्थितीशी जुळतात.

म्हातारपणी केलेली दुसरी बायको, त्या बायकोने लाघवाने नवऱ्याला ताटाखालील मांजर करून टाकणे, त्यामुळे पहिल्या बायकोच्या अपत्याविषयी त्याचे प्रेम पातळ होणे, दुसऱ्या बायकोचे त्या अपत्याशी लाघवी वर्तन हे भाग वाचकांना आवडतात. राजाच्या मुलांच्या चरित्राचे, रामचंद्राचे पुत्र लव व कुश यांच्या चरित्राशी साम्य असल्यामुळे व

Leonatus आणि Imogen यांचे शील व रामचंद्र-सीता यांचे शील बरेचसे सारखे असल्यामुळे हे नाटक आपल्या देशातील लोकांना आवडते.

श्री. बापट यांच्या या विवेचनांतील पूर्वभाग तत्कालीन समाजचित्र किंवा सामाजिक वास्तव म्हणून आपल्या प्रेक्षकांना आवडत असेल परंतु रामचंद्राशी तुलना करण्याएवढी उदात्तता Leonatus च्या व्यक्तिरेखेत निश्चितच नाही. रामाला सीतेच्या चारित्र्याविषयी कधीही शंका नव्हती. रामाच्या जीवनातील पेच तो राजा होता म्हणून निर्माण झाला. Leonatus ने अविवेकीपणाने भयंकर पैज लावली त्यातून त्याच्या आणि Imogen च्या वाट्याला दु:ख आले. Cymbeline च्या दोन पुत्रांचे लव-कुशांशी साम्यसुद्धा फार मर्यादित प्रमाणात आहे. Cymbeline चे पुत्र पळविले गेले होते आणि ते जंगलात वाढत होते. लव-कुशांचा जन्म, त्यांचा आश्रमातील निवास, तिथे त्यांच्यावर वाल्मिकीनी केलेले संस्कार हा कथाभाग खूपच वरच्या पातळीवरील आहे. ऊूलशश्रळशि मध्ये हा भाग केवळ कथानकांची गुंफण, गुंतागुंत आणि शेवटी उकल यासाठी येतो. त्यातून उदात्त जीवनदर्शन घडविणे हा शेक्सपीअरचा हेतू नाही आणि तसा परिणामही त्यातून साधत नाही म्हणून श्री. बापट यांनी केलेली ही तुलना अतिव्याप्त वाटते.